महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.

दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


==========================================================================

जावक क्रमांक – ७२१ /३२ दिनांक :- ०७ मार्च , २०२५

प्रसिद्धिपत्रक

## म्हाडा मुंबई मंडळातर्फे स्वामी विवेकानंद शिक्षण विकास मंडळ ट्रस्टला दिलेल्या शाळेलगतच्या मैदानावर नेटशेड उभारणीसाठी एक वर्ष कालावधीकरिता ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान

मुंबई, ७ मार्च २०२५ – म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने गोराई, बोरीवली येथील स्वामी विवेकानंद शिक्षण विकास मंडळ ट्रस्टला भाडेपट्टा करारनाम्याद्वारे दिलेल्या शाळेलगतच्या खेळाच्या मैदानावर टर्फ टाकुन नायलॉन जाळीचे नेटशेड उभारणीसाठी एक वर्षाच्या कालावधीकरिता संस्थेस ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. विद्यार्थी, खेळाडूंचे हित लक्षात घेता मंडळातर्फे सदर निर्णय घेण्यात आला आहे.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी यांची आज म्हाडा मुख्यालयात भेट घेऊन सदरहू नेट शेडचे पुनर्स्थापन करून ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत विनंती केली. तसेच संस्थेकडुन नेट शेडचा वाणिज्य वापर होणार नाही अथवा गैरवापर होणार नाही याची हमी दिली आहे. या हमीच्या आधारे ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. या नेडशेड मैदानाचा कोणत्याही प्रकारे व्यावसायिक वापर केला जाणार नाही, अशी हमी शाळेने दिली आहे. शाळेच्या विश्वस्तांनी नियमांचे पालन करण्याची ग्वाही दिल्यानंतरच एक वर्षासाठी ना हरकत प्रमाणपत्र (NOC) मंजूर करण्यात आले आहे. मात्र, हे ना- हरकत प्रमाणपत्र विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठीच देण्यात आले असून व्यावसायिक हेतूंसाठी याचा वापर करता येणार नाही. मंडळाने शाळा प्रशासनाला स्पष्ट निर्देश दिले आहेत की, नेटशेड मैदानाचा कोणत्याही प्रकारे अनधिकृत व्यावसायिक वापर करू नये.

शाळेने दि. ०२.०२.२०२२ व दि.०१.०६.२०२२ रोजींच्या पत्रांन्वये शाळेशेजारील खेळाच्या मैदानावर टर्फ टाकुन नायलॉन जाळीचे नेटशेड करिता विनंती केली होती. त्यास अनुसरुन म्हाडा मुंबई मंडळ यांनी दि. ०१.१२.२०२३ रोजी १ वर्षाच्या कालावधीसाठी वाणिज्य वापर न करण्याच्या अटींवर शाळेस ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते.

परंतु, सदरहू नेटशेड मैदानाचा वाणिज्य वापर होत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर व ना-हरकत प्रमाणपत्राची ०१ वर्षाची मुदत संपुष्टात आल्याने शाळेला सदरील नेटशेड काढुन घेण्याबाबत या कार्यालयामार्फत नोटीस देण्यात आली होती.

संस्थेने याबाबत कोणेतेही सहकार्य न दाखविल्याने व सदरील नेट शेड काढुन न घेतल्याने म्हाडाने सदरहु नेट शेड काढून घेण्यासाठी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन घेऊन दि.०५.०३.२०२५ व दि.०६.०३.२०२५ रोजी सदरहू नेटशेडचे निष्कासन करण्यात आले.

म्हाडाने हा भूखंड मूळतः विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठीच भाडेतत्वावर दिला होता आणि त्यानुसार त्याचा वापर फक्त शैक्षणिक आणि खेळांसाठीच केला पाहिजे. मुंबई मंडळाने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की, या मैदानाचा वापर केवळ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि खेळासंबंधी उपक्रमांसाठीच होणे आवश्यक आहे.

स्वामी विवेकानंद शिक्षण विकास मंडळ ट्रस्ट या संस्थेस प्लॉट क्र. १२, गोराई-१, बोरीवली (प.), मुंबई-४०००९१ येथील म्हाडाच्या अभिन्यासातील कंपोझिट स्कुल प्लॉट २५६७,०० चौ. मी. शाळा बांधण्यासाठी व ३३०८.६० चौ.मी. खेळाचे मैदान असा एकुण ५८७५.६० चौ. मी. भूखंड दि.१६.१२.१९९४ रोजी भाडेपट्टा करारनाम्याद्वारे वितरीत करण्यात आला.

दरम्यान, म्हाडा मुंबई मंडळाने घेतलेल्या या निर्णयाबाबत शाळेतील क्रिकेट प्रशिक्षक श्री. दिनेश लाड यांनी समाधान व्यक्त केले असून, एक वर्षाकरिता ना- हरकत प्रमाणपत्र दिल्याने त्यांनी मंडळाचे आभार मानले आहेत.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा



**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Phone No:- 022 66405066/77 Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================================

Outward No. : . 721/32 Dt. March 7, 2025

Press Release

## MHADA Mumbai Board Grants NOC for One Year to Swami Vivekananda Shikshan Vikas Mandal Trust for Net Shed Construction on School Playground

Mumbai, March 7, 2025 – The Mumbai Housing and Area Development Board, a unit of MHADA, has granted a one-year's No Objection Certificate (NOC) to install a turf and construct a nylon net shade on the sports ground allotted to Swami Vivekanand School (SVIS) in Gorai, Borivali. This extension follows an assurance from the school's managing trustee that the facility will not be used for commercial purposes.

Representatives of the trust met with MHADA Mumbai Board's Chief Officer at MHADA headquarters today to request the reinstallation of the net shed and issuance of the NOC. The trust assured that the net shed would not be used for commercial purposes or misused in any way. Based on this assurance, the decision to grant the NOC was taken. The school has given a commitment that the net shed will not be used for any commercial activities. After the school's trustees agreed to comply with all regulations, the one-year NOC was approved. However, the NOC is granted strictly for student use only and not for commercial purposes. The board has explicitly directed the school administration not to engage in any unauthorized commercial use of the net shed on the ground.

The school had previously submitted requests on February 2, 2022, and June 1, 2022, seeking permission to install a turf and a nylon net shed on the adjacent playground. In response, MHADA Mumbai Board issued an NOC on December 1, 2023, for one year, with a condition prohibiting commercial use of the facility.

However, complaints were received regarding commercial usage of the net shed playground. Additionally, as the one-year NOC period had expired, MHADA issued a notice instructing the school to remove the net shed. When the institution failed to comply and did not dismantle the structure, MHADA, with police assistance, removed the net shed on March 5 and March 6, 2025.

MHADA had originally leased the plot for student use only, meaning it should be utilized solely for educational and sports purposes. The Mumbai Board has once again clarified that the playground must strictly be used for student-related academic and sports activities.

The Swami Vivekananda Shikshan Vikas Mandal Trust was allocated Plot No. 12, Gorai-1, Borivali (W), Mumbai-400091, consisting of 2,567.00 sq. m. for school construction and 3,308.60 sq. m. for a playground, totaling 5,875.60 sq. m. under a lease agreement dated December 16, 1994.

Meanwhile, Mr. Dinesh Lad, a cricket coach at the school, has expressed satisfaction with MHADA Mumbai Board's decision and has thanked the board for granting an NOC for a netshed for a period of one year.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA